# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन शिवार, नाशिक - 422 222.

दूरध्वनी - (0253) 2231714, 2231715, 2230027


**जा.क्र.- यचममुवि/आस्था/2021/**205 **दिनांक** : 06.04.2021

0 8 APR 2

**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. वशिअ - 1214/प्र.क्र.26/11, दिनांक 02 जून 2014**

## परिपत्रक

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी (ड वर्गातील कर्मचारी वगळून) दिनांक 31 मार्च, 2021 रोजी असणाऱ्या त्यांच्या मत्ता व दायित्वे यांचे वार्षिक विवरणपत्र प्रपत्र 1,2 व 3 मध्ये नमूद केल्यानुसार भरून, सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाची आहेत. विवरणपत्राचे लिफाफे सिलबंदच असावेत. खुल्या स्वरूपात कोणत्याही स्थितीत विवरणपत्रे पाठवू नयेत. सदर लिफाफ्यावर खालील बाबी नमूद कराव्यात.

1. मत्ता व दायित्वाचे वार्षिक विवरणपत्र दिनांक 31 मार्च 2021 अखेर.
2. शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम
3. विद्याशाखा / विभाग / केंद्र / कक्षाचे नाव

विद्याशाखा / विभाग/ केंद्र / कक्षातील प्रत्येक कर्मचाऱ्याचे (ड वर्गातील कर्मचारी वगळून) दिनांक 31 मार्च 2021 रोजी असणाऱ्या मत्ता व दायित्वाच्या विवरणपत्राची माहिती भरून घेऊन आस्थापना कक्षाकडे दिनांक 31 मे 2021 पर्यंत पाठविण्यात यावी. विवरणपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास संबंधित कर्मचारी शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरेल. पदोन्नती / आश्वासित प्रगती योजनेतील पदोन्नतीसाठी विवरणपत्र सादर केल्यानंतरच पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल, याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

कुलसचिव

सोबत - विवरणपत्र 1,2 व 3

प्रत माहितीसाठी - मा. कुलगुरू कार्यालय

प्रति - 1. सर्व विद्याशाखा/विभाग/केंद्र/कक्ष प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक अधिनस्त सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी (ड वर्गातील कर्मचारी वगळून) यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

2. सर्व विभागीय केंद्र

3. प्रोग्रामर, संकेतस्थळ माहीतीसाठी, सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.